# पुण्य नगरी

पुणे – सोलापूर ♦ वर्ष ११ ♦ अंक १८९ ♦ शुक्रवार, १४ मे २०१० ♦ पाने १२, किंमत २.०० रुपये

## गजानन महाराज जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



सोलापूर, दि. १३ (प्रतिनिधी) - अक्कलकोट तालुक्यातील शिवपुरी येथे स्वामी समर्थांनी स्थापन केलेल्या गुरूपीठाचे चौथे महापुरुष गजानन महाराज यांच्या जन्म ेत्सवानिमित्त १६ व १७ मे रोजी विविध कार्यक्रम ंचे आयोजन करण्यात आल्याची माहित्ती विद्याधर पारखे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवार, १६ मे रोजी रात्री ९ वाजता पद्मश्री कित्ताबप्राप्त प्रसिध्द गायिका पद्मजा फेणाणी (जोगळेकर) यांचा भक्तीगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमात त्या स्वामी गीते, भक्तिगीते सादर करणार आहेत. रात्री १२.४५ पर्यंत श्रमसेवा, वैदिक जीवनपध्दतीची शिकवण, अग्निहोत्र प्रचार-प्रसार वृत्तांत, ध्यान, योग, संगीत, भक्तीगीते व आराधना असे कार्यक्रम होतील. गजानन महाराजांच्या भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पत्रकार परिषदेस विठ्ठल शिरसीकर, जितेंद्रकुमार जाजू आदी उपस्थित होते.